MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

Tel : 27576034
Fax: 27562132

Sub Regional Office, Raigad- I
Raigad Bhaven, 6th Floor,
Sector No. 11, C. B. D. Belapur,
Navi Mumbai – 400 614

No. MPCB/SRORD-I/TB- 130628FT0192

Date:- 28/06/2013

To,
The Joint Director (WPC),
M. P. C. Board,
Mumbai.

**Sub: Minutes of Environmental Public Hearing at Patalganga Vidyalaya at Village Honad for proposed expansion of existing manufacturing facility by M/s. Prasol Chemical Ltd, at Takai-Adshi Road, Honad Village, Tal- Khalapur, Dist – Raigad**

**Ref: District Collector, Alibag letter No. Grahshakha/MAG-1/ Ittivratta/ 2013, dated – 27/06/2013.**

Sir,

With reference to above please find enclosed herewith the Minutes of Environmental Public Hearing at Patalganga Vidyalaya at Village Honad for proposed expansion of existing manufacturing facility by M/s. Prasol Chemical Ltd, at Takai-Adshi Road, Honad Village, Tal- Khalapur, Dist – Raigad

Submitted for your information and further necessary action please.

Yours faithfully,

28/06/13

(S. L. Waghmare)
**Sub – Regional Officer,**
**Raigad - I**

**Encl: Original Minutes of Environmental Public Hearing in Marathi & English**

## MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD.

### Regional Office-Raigad

**Raigad Bhavan,6th Floor, Sector-11, CBD, Belapur,Navi Mumbai.**

**Minutes of Environmental Public Hearing at Patalganga Vidyalaya at village Honad for proposed expansion of existing manufacturing facility by M/s. Prasol Chemical Ltd, at Takai-Adoshi Raod, Honad Village, Tal.Khalapur, Dist-Raigad , Maharashtra.**

**Date :- 16th May, 2013** **Time :- 11.00 A.M.**

As per the provision of the EIA Notification of Ministry of Environment and Forest, Govt. of India, New Delhi, dated 14th September, 2006 and as amended from time to time Synthetic organic chemical projects located outside MIDC area requires Environmental Clearance under 5(f) category from the Ministry of Environment & Forest, Govt. of India, New Delhi, for which public hearing procedure is necessary. M/s. Prasol Chemical Ltd, Located at S.No. 8,13, 15, 16, 25 and 75 , Takai- Adoshi Road, Honad Village, Tahsil Khalapur, District Raigad, Maharashtra is proposed to expand its manufacturing facility by setting manufacturing plants for phenol/ acetone and other products like Zinc Di-organo Dithiophosphate (ZDDP), Mesityl/ oxide, Hydrogenated Compounds and by products like Alpha methyl styrene, Acetophenone. They have been granted TOR by MoEF vide its letter dtd 29th October,2012 which requires company to submit an EIA report including public hearing.

Accordingly the company made an application dted 26th February,2013 to Regional Office, MPCB,Raigad. It was decided to conduct public hearing in respect of the said project on 16thMay, 2013 in consultation with District Collector, Raigad. Maharashtra Pollution Control Board published public notices in Marathi (Local language) newspaper namely "Dainik Krushival" and English newspaper "Indian Express" both dated 15th April 2013 mentioning about date, time , venue and appeal was made to submit objections, suggestions, comments, if any in respect of the said project to concerned regulatory authority. It was also mentioned that written responses will also be accepted at the time of public hearing.

The venue for the said public hearing was decided to be Patalganga Vidyalaya at village Honad, Tal.Khalapur, District –Raigad, Maharshtra considering the facilities such big ground, easy accessibility to the local populance & being in close proximity of the proposed project site. Copy of executive summary in respect of said project were made available in Marathi as well as English alongwith copy of draft E.I.A. report were kept in the offices of District Collector, Raigad; Sub-Divisional Officer, Khalapur, Panchayat Samiti, Khalapur, Dist-Raigad. Group Grampanchayat Office, Tal. Khalapur, Sarpanch Group Grampanchayat Office, Honad, Tal. Khalapur, District Industries Centre, Alibag, Environment Department GoM, MoEF Bhopal, MPCB, Sion, Mumbai, Regional Office, Raigad, Maharashtra Pollution Control Board, Raigad Bhavan 6thFlr, C.B.D. Belapur, Navi Mumbai to apprise the public. All these authorities were requested to widely publish it within their respective jurisdiction.

..2.

Office order was issued by Member Secretary, Maharashtra Pollution Control Board, Mumbai by order No. BO/JD(WPC)/PH/B-2104 dtd. 30/04/2013 (OFFICE ORDER NO. E-49 OF 2013) and a committee for conducting public hearing was constituted as under :-

1. **Shri. H. K. Jawale** **- Chairman**
   **Collector & District Magistrate, Raigad**
2. **Shri. B. P. Solunke** **- Member**
   **Regional Officer,**
   **Maharashtra Pollution Control Board, Raigad**
3. **Shri. S. L. Waghmare** **- Convener**
   **Sub-Regional Officer,**
   **Maharashtra Pollution Control Board, Raigad-I**

At the outset the convener of the Public Hearing Shri. S. L. Waghmare, Sub-Regional Officer, Maharashtra Pollution Control Board , Raigad-I welcomed all those present and commenced the public hearing. Introductory information about the purpose of Environmental Public Hearing was given and an appeal was made to them to come forward with suggestions, objections and comments if any, about the environmental aspects of the proposed project. He further stated that the presentation about the proposed project will be given by the project proponent and then the questions / objections etc. will be answered by the project proponent after the presentation. After permission of Chairman, presentation was commenced.

On behalf of the project proponent, Shri. Amey Gawade, from Aditya Environmental Services Pvt. Ltd gave a PowerPoint Presentation on the Environmental aspects of the project including salient features of the project.

**Following is the summery of the Presentation:**

1. **Need of the project.**
2. **Raw Material and product details.**
3. **Manufacturing process.**
4. **Base line data with respect to Air, Water, Land, Noise, Ecology, Settlement etc.**
5. **Impact likely to occur due to the project on Air, Water, Noise, Hydrology, Settlements and Bio-diversity and forest.**
6. **Mitigation measure and Environment Management plan for the project during construction phase as well as operation.**
7. **Corporate Social Responsibility.**

After completion of power point presentation, Chairperson of the public hearing (Collector - Raigad) gave opportunity to public present to ask questions if any about proposed project. He also stated that the reply will be given by the concerned authority. Accordingly question raised is as below :-

...3.

**Question 1: Mr. Prakash Patil: Vill-Honand.**

He welcomed the proposed expansion. He stated that given though company will utilize effluent after treatment, but the company must ensure that proposed project will not affect nearby agriculture and livestock due to their waste water and company should take due care in this regard.

**Question 2: Mr. Eknath Pingale: Khopoli.**

He welcomed the proposed expansion and thankful of MPCB to come forward to take opinion of general public and for providing information on Environment protection measures, CSR, etc. He further stated that company must ensure that proposed project will not affect nearby agriculture and livestock after proposed project become operational.

**Question 3: Mr. Narendra Gaikwad : Khalapur**

He welcomed the proposed expansion. And thankful of MPCB to come forward to take opinion of general public through public hearing. He further stated that company should ensure that any contaminant / chemical will not be released to the soil which will create hazard to the populace and agriculture nearby. He pointed out that company is proposing to employ 40 persons directly and 60 persons through contract as per the presentation made. He asked the company to prefer locals for employment on both direct and contract basis.

**Question 4:Mr. Ramchandra Deshmukh:**

He welcomed the proposed expansion. And also welcomed the move to come forward with public about said project. He raised the question that if problem rose during operational stage then what is action to be taken? He also further stated that company must ensure that proposed project will not affect nearby fields and livestock after proposed project become operation and employment shall be given to local people.

**Question 5: Mr. Dilip Mahadev Deshmukh, Vill- Honad,**

Raised several points as listed below:- Existing factory is present in the area since 1995. In today's hearing company said about opening of training centre, providing electronic gadgets to local schools, shades on bus stop, health check up, scholarship, etc. but company h as not done any CSR activity in past 18 years. So how can we trust they will do it in future?

For the proposed unit, 60 contract employees against 40 direct employees will be required. How the proponent ensure that jobs will be generated for the local people?

He further stated that company has not done publicity of the public hearing and he got the message of public hearing in the morning. Because of lack of publicity only 100 people have attended and majority of attendees of the public hearing were company's employees.

Presentation of the hearing is difficult to understand for the general public or farmer because of chemicals terminology.

During presentation it was stated that hazardous waste will be send to TSDF, Taloja . But, will they accept the waste and will have the enough capacity for treatment ?

..4.

Number of complaint made against air pollution in the area for last 10 years. But Government has not done any action against them. School river and national highway are adjacent to plot which is not shown during presentation. Also, detailed information of fly ash disposal was not give.

Existing constructed greenbelt is inadequate. Is there available for greenbelt to disposed 21 CMD treated effluent ? He further informed that adequate measures shall be taken limit pollution problems. Thereafter permission may be granted.

**Question 6:Mr. Umesh Patil, Chincholi Grampanchayat**

Accidents like the Bhopal gas tragedy should not take place in the village and company should take correction measures and take periodic health checkup, if accident take place then who take responsibility?

**Question 7: Mr. Harishchandra Deokar**

In the presentation, the words used are technical which are difficult to understand for the village people and farmers. So very few farmers will rasied the questions. During the presentation it was stated that hazardous waste will be generated in process. If hazardous waste will be generated the is the product hazardous? Company did not mention the presence of the school in the vicinity. He insisted that the company must ensure that the project will not adversely affect the school children. He further requested dignitaries to thin form all sides before granting the permission for expansion and ensure that industry shall do plantation sufficiently and they shall not be nuisance to nearby farmer.

**Question 8: Mr. Sandeep Patil.**

He stated that the area already becomes polluted because of presence of factories and no one has being taking any major step to reduce the pollution. Hence addition of one more unit will lead to increase in pollution levels and hence expressed objection for the proposed expansion.

**Question 9: Mr. Dinesh Patil, Dainik Sagar Newspaper**

He was thankful for calling public hearing and providing information of investment, products, environmental protection measures, etc for proposed expansion. He asked Company to stick to their commitment for compliance of the environmental protection measures. He stated that some years back a waste carrying truck had disposed off waste meant for disposal at Taloja near a village resulting in death of few domesticated animals and asked Company management to be diligent and ensure that this does not happen. M.P.C.Board shall take action immediately.

After the above questions, Chairman of the Public Hearing (Collector Raigad) further requested the attendees to come forward and ask any further queries/doubts etc and gave further time to ask questions **as there is no any question than the**

**Chairman of the Public Hearing (Collector Raigad) then asked convener to answer the queries raised about publicity of public hearing -**

...5.

**Mr. S. L. Waghmare, SRO MPCB, replied that –**

As per the provisions of the EIA Notification, Maharashtra Pollution Control Board published public notices in Marathi (local) newspaper namely "Dainik Krushival" and English newspaper "Indian Express" both dated 15/04/2013 giving details of the Public hearing to be held and venue with time etc. He further stated that copy of executive summary in respect of said project were made available in Marathi as well as English along with copy of draft E.I.A. report in the offices of District Collector, Raigad; Sub-Divisional Officer, Khalapur, Panchayat Samiti, Khalapur, Dist-Raigad. Group Grampanchayat Office, Tal. Khalapur, Sarpanch Group Grampanchayat Office, Honad, Tal. Khalapur, District Industries Centre, Alibaug, Environment Department GoM, MoEF Bhopal, MPCB, Sion, Mumbai, Regional Office, Raigad, Maharashtra Pollution Control Board, Raigad Bhavan 6th Floor, C.B.D. Belapur, Navi Mumbai to apprise the public.

**Chairman of the Public Hearing (Collector Raigad) asked EIA Consultant/company representative to explain meaning of term "hazardous waste" and how such waste will be disposed –**

**Mr. Rajiv Aundhe Director of Aditya Environmental Services Pvt Ltd replied that –**

Ministry of Environment and Forest issued Hazardous Waste (Management & Handling) Rules and regulation and based on these rules the hazardous waste will be disposed as per the norms, based on various points and from proposed expansion few waste generated will fit into the prescribed rules hence it will handle and disposed as per norms. The hazardous waste will be disposed at common store, treatment and disposal facility at Taloja, Navi Mumbai.

**Chairman of the Public Hearing (Collector Raigad) asked EIA Consultant/company representative to explain effluent treatment –**

**Mr. Rajiv Aundhe Director of Aditya Environmental Services Pvt Ltd replied that –**

Effluent will be evaporated in three stages and converted into vapor form. Then vapor is condensed and condensate will be reused in the process. Residue generated during this evaporation process will be hazardous as per Hazardous waste Rules. Hence, it will be send to MPCB authorized disposal site at Taloja for disposal. Other non hazardous effluent will be neutralized and disposed off by gardening or through PRIA CETP.

**Chairman of the Public Hearing (Collector Raigad) asked to explain what is the impact of proposed project on nearby populace and animals –**

**Mr. Rajiv Aundhe Director of Aditya Environmental Services Pvt Ltd replied that –**

Company will take all precaution as shown in the presentation and he further stated that proposed project is based on zero discharge principle hence will not affect nearby agriculture and live stock. Also to minimize air pollution, two stacks of 30 m height will be provided which will be equipped with bag filters and cyclone. Stack emission will be regularly monitored. He further stated that generated fly ash will be disposed as per norms. Present level of air /water quality is monitored and same found within the norms.

...6.

**Chairman of the Public Hearing (Collector Raigad) told to explain existing and proposed employment –**

**Mr. Gawade, Manager HR from Prasol Chemicals Ltd.**

Replied that around 84% employees in the existing factory were locals and for the proposed unit also, locals will be preferred for employment. In which 40 will be direct employees and 60 contract employees. Presently there are 4 local contractors are working with company. Also made announcement to send application to the company for suitable jobs. He further stated that company will open training centre in which fitter, welder etc job oriented training will be given to interested people (even non matriculates).

**Chairman of the Public Hearing (Collector Raigad) told to explain CSR activity done since 1995 Mr. Gawade Manager HR from Prasol Chemicals Pvt. Ltd. stated that -**

Company has arranged dental camp, provided computers to schools and given donation for temples as CSR activity. Also agreed that not done major CSR activity apart from that.

**Chairman of the Public Hearing (Collector Raigad) told to explain what action taken till date on complaints of pollution –**

**Mr. Gawade Manager HR from Prasol Chemicals Pvt. Ltd. stated that –**

Company has provided scrubbing system to minimize obnoxious smell and air pollutant. Company noticed complaint of obnoxious smell and put scrubber system to minimize air pollution emission.

**Chairman of the Public Hearing (Collector Raigad) told to explain green belt development plan–Mr. Gawade Manager- HR from Prasol Chemicals Pvt. Ltd. stated that –**

he agreed that existing greenbelt is inadequate and now company will comply, as company have in 16 acres of total land by planting on 21,427 sq. m. plot area using local indigenous species. 500 to 550 trees are present at the site. And assured to plant sufficient tress/ plantation.

**Chairman of the Public Hearing (Collector Raigad) asked to explain precaution taken to avoid any incident like Bhopal –**

**Mr. Rajiv Aundhe consultant replied that –**

In the proposed plant manufacturing products and raw materials are not toxic they are flammable under B class. Hence, incidents like the Bhopal gas tragedy will not happen. Also, he also mentioned that detailed risk analysis is carried out and presented in the study.

**Chairman of the Public Hearing (Collector Raigad) asked about health check of student from nearby school –**

**Mr. Gawade Manager H.R. from Prasol Chemicals Pvt. Ltd. replied that –**

till date no health check of student from nearby school has been done by company. But company proposed to do the same as part of CSR activity.

**Chairman of the Public Hearing (Collector Raigad) told to explain measure taken to minimize smell of $H_2S$ –**

**Mr. Rajiv Aundhe consultant replied that two stage scrubbers will be provided and residual amount will be flare in the chimney.**

…7.

**Mr. Gaikwad stated that** he had filed complaint against pollution from various companies from the area. But till date no action taken against them. Also water from borewell, open well gets polluted.

**Chairman of the Public Hearing (Collector Raigad)** suggested to give priority to locals in employment and to improve CSR activity by including health check up of school children, women and old persons as the said unit is 18 years old. Instructed to keep 33% land for green development. Industry shall take necessary measures about water pollution. He further stated that MPCB shall submit their report about other complaint within 15 days time.

He further stated that because of presence of school in the vicinity, company should take all precautionary measure to minimize pollution and also directed to develop green belt. Company should take permission for disposal of hazardous waste to TSDF Taloja.

He further stated that company has made provision of Rs. 210 lakhs as capital investment and Rs.52 lakhs as Operation & Maintenance cost for Environment Management Plan and should adhere to the commitments made.

The Chairman of the Public Hearing (Collector Raigad) while concluding the proceedings stated that comments, suggestion, views, objections raised during the public hearing will be incorporated in the proceedings and will be further communicated to Ministry of Environment and Forest, G.O.I; New Delhi, for consideration of grant of Environmental Clearance for the project. And after permission from GOI project will be implemented.

With this the Chairman concluded the Public Hearing with vote of thanks.

**(B.P Solunke),**
Regional Officer- MPCB
Member- Public Hearing Committee

**(H.K. Jawale)**
Collector- Raigad
Chairman- Public Hearing Committee

**(S.L. Waghmare)**
Sub-Regional Officer, MPCB Raigad-I,
Convener- Public Hearing Committee

***************

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## प्रादेशिक कार्यालय-रायगड

**रायगड भवन ६ मजला, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.**

प्रस्तावित वाढीव कार्बनी रसायनांच्या उत्पादनांसंबंधी मे. प्रसोल केमिकल्स लिमिटेड यांच्या गांव होनाड, ता.खालापूर, जिल्हा-रायगड येथील कारखान्याची पर्यावरण जनसुनावणी चे इतिवृत्त.

**वेळ :- सकाळी ११.०० वा.** **दिनांक :- १६ मे, २०१३**

## *इतिवृत्त*

केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या दिनांक १४ सप्टेंबर,२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन नोटिफिकेशन आणि क्रमवार झालेल्या बदलानुसार ५ (फ) गटवारी नुसार सिंथेटिक रसायनांचा प्रकल्प महाराष्ट्र औद्योगिक प्राधिकरण क्षेत्राच्या बाहेर असल्यास त्यासाठी पर्यावरणीय जनसुनावणी घेणे बंधनकारक असते. मे.प्रसोल केमिकल लि चा प्रस्तावित विस्तारीत प्रकल्प हा सर्व्हे क्रमांक ८,१३,१५,१६,२५ आणि ७५ ताकाई आडोशी रस्ता, होनाड गाव, खालापूर तालुका, जिल्हा-रायगड येथे असून कंपनी चे मुख्य उत्पादन फीनॉल, एसीटोन इतर उत्पादने झींक डाय-ऑरग्यानो डिथिओफोस्फट (झेड.डी.डी.पी), मेसीटील ऑक्साईड, हायड्रोजीनेटेड संयुगे आहेत. तसेच दुय्यम उत्पादने अल्फा मिथाईल स्टायरीन आणि एसीटोफीनोन आहे. केंद्रीय पर्यावरण तज्ञमुल्यांकन समितीने २९ ऑक्टोबर,२०१२ मध्ये झालेल्या ६६ व्या बैठकीमध्ये प्रसोल केमिकल्स लिमिटेड यांना पर्यावरण आघात मुल्यांकन नोटिफिकेशन २००६ नुसार पर्यावरण जनसुनावणी घेण्याचे नमूद केले आहे.

त्यानुसार कंपनीने मप्रनि मंडळाकडे अर्ज केला आणि जिल्हाधिकारी रायगड, महाराष्ट्र च्या समहमतीने १६ मे २०१३ रोजी पर्यावरण जनसुनावणी घेण्याचे ठरले. जनसुनावणी संदर्भात दैनिक कृषिवल या स्थानिक व इंडियन एक्सप्रेस या राष्ट्रीय पातळीवरील वर्तमानापत्रामध्ये दिनांक १५/०४/२०१३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती आणि त्यात जनसुनावणीची तारीख , वेळ आणि ठिकाण नमूद केले होते. तसेच काही माहिती किंवा प्रश्न असल्यास ते संबंधित कार्यालयात विचारण्यास विनंती केली होती. तसेच लिखित प्रश्न हे पर्यावरण जनसुनावणी दरम्यानही घेतले जातील असे नमूद केले. संबंधित पर्यावरणीय जनसुनावणीचे फलक गावातील मुख्य ठिकाणी लावण्यात आले.

पर्यावरण जनसुनावणीसाठी पातळगंगा विद्यालय हे ठिकाण निश्चित केले, कारण शाळेला पटांगण असून यासाठी जागा ही लोकांच्या रोजच्या रहदारीची आहे. तसेच ही जागा प्रकल्पापासून जवळ आहे.

प्रकल्पाच्या सारांशाची आणि पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची सत्यप्रत ही मराठी आणि इंग्रजीत जिल्हाधिकारी रायगड, उप विभागीय अधिकारी खालापूर, पंचायत समिती खालापूर, ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय, होनाड; जिल्हा उद्योग केंद्र अलिबाग, पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन (मंत्रालय), केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालय भोपाल, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई आणि रायगड येथे सामान्य नागरिकांसाठी ठेवण्यात आली होती.

...२.

सदस्य सचिव मप्रनि मंडळ यांनी पर्यावरणीय जनसुनावणी संबंधी कार्यालयीन आदेश क्र ई-४९ चे २०१३, दिनांक ३०/०४/२०१३ पारीत केले त्यानसुार खाली नमूद केलेल्या सदस्यांची समिती नेमण्यात आली.

श्री. एच.के. जावळे (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, रायगड : समिती अध्यक्ष.

श्री. बी.पी.सोळुंके
प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, रायगड : समिती सदस्य.

श्री. एस.एल.वाघमारे
उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, रायगड : कार्यवाहक.

सुरुवातीस श्री. एस.एल.वाघमारे, उप-प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, मप्रनि मंडळ, यांनी आजच्या जनसुनावणीस उपस्थित असलेले मा. जिल्हाधिकारी, रायगड व मा. तहसिलदार, खालापूर आणि समस्त ग्रामस्थांचे स्वागत केले. त्यांनी पुढे अशी माहिती दिली की, केंद्रीय व वने पर्यावरण मंडळाच्या २००६ च्या तरतुदी नुसार प्रकल्प सुरु करण्यापूर्वी सदर प्रकल्पाबाबत जाहीर जनसुनावणी घेणे बंधनकारक असल्यामुळे, तसेच या प्रकल्पाबाबत स्थानिक ग्रामस्थांची मते जाणून घेण्यासाठी, प्रकल्पाबाबतच्या संपूर्ण माहिती आकलन स्थानिक ग्रामस्थांना व्हावे याकरिता आज या जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे. सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर, संबंधित कारखान्याचा विस्तार करण्याच्या बाबतीत उपस्थितांचे जे प्रश्न / मुद्दे असतील त्याची लेखी नोंद घेण्यात येईल व प्रश्न / मुद्दे मांडून पूर्ण झाल्यानंतर, त्या संदर्भातील उत्तरे देण्यात येतील.

तद्नंतर मा. जिल्हाधिकारी महोदयांनी, प्रकल्प प्रवर्ताकाकडून श्री. अमेय गावडे, आदित्य एनव्हायर्नमेंटल सर्व्हीसेसे प्रा.लि. च्या अधिका-यांना प्रकल्पा संदर्भातील सादरीकरण करण्यास सांगितले.

सादरीकरणामधील काही ठळक वैशिष्टे खालील प्रमाणे:-

१. प्रकल्पाची गरज
२. कच्चा माल अणि उत्पादन
३. निर्मिती प्रक्रिया
४. हवा, पाणी, जमीन, ध्वनी, जैविक, इत्यादीचे प्रमाण त्या क्षेत्रातील प्रमाण
५. हवा, पाणी, जमीन, ध्वनी, जैविक, इत्यादी वर प्रकल्पामुळे होणारे परिणाम
६. **पर्यावरण व्यवस्थापन अहवाल**
७. सामाजिक बांधिलकी

...३.

तद्नंतर मा.जिल्हाधिकारी महोदयांनी उपस्थितांना अशी विनंती केली की , ज्यांना सादरीकरण / प्रकल्पासंदर्भात काही प्रश्न विचारावयाचे असल्यास किंवा काही मुद्दे उपस्थित करावयाचे असल्यास त्यांनी उपस्थित करावे. सर्व प्रश्नांच्या शेवटी संबंधित प्राधिकरणाचे अधिकारी प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देतील.

**श्री.प्रकाश पाटील ,** होनाड **:-** मे.प्रसोल केमिकल्स लिमिटेड या व्यवसाय संस्थेच्या प्रस्तावित वाढीव कार्बनी रसायनांच्या कारखानचे स्वागत. परंतु प्रदूषित पाण्याचे व्यवस्थापन व विल्हेवाट या शिर्षकांतर्गत पाण्यावर प्रक्रिया केल्यानंतर ते अन्य कामांकरिता वापरण्यात येणार असले तरी या कारखान्याच्या परिसरातील नागरिकांचा शेती हा मुख्य व्यवसाय असल्यामुळे या विभागातील स्थानिक रहिवाशी व त्यांचे पाळीव पशु / पक्षी यांवर त्याचा विपरीत परिणाम होऊन, त्यांच्या जिवीतास धोका पोहोचणार नाही याची काळजी कंपनी व्यवस्थापनाने घेणे आवश्यक आहे.

**श्री. एकनाथ पिंगळे,** खोपोली :- मे. प्रसोल केमिकल्स लिमिटेड या कारखान्याच्या माध्यमातून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे प्रस्तावित कारखान्याची स्थापना करण्यापूर्वी स्थानिक नागरीकांचे मत जाणून घेण्याकरिता आयोजित केलेल्या या जनसुनावणीचे स्वागत केले. सादरीकरणाच्या माध्यमातून संबंधित कारखान्यातर्फे कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत, जैविक पर्यावरणाचे कशा स्वरुपात संरक्षण करण्यात येणार आहे, कारखान्याची सामाजिक बांधिलकी या सर्व बाबी स्पष्टपणे उपस्थितांसमोर मांडल्या त्याबद्यल त्यांनी संबंधित व्यवसायसंस्थेचे आभार मानले.

ते पुढे असे म्हणाले की, कारखाना सुरु झाल्यानंतर, संबंधित कारखान्याने पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने तसेच या परिसरातील गावकरी व त्यांची जनावरे यांना कोणत्याही स्वरुपाचा त्रास होणार नाही याकरिता उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

**श्री. नरेंद्र गावकवाड,** खालापूर :- मे. प्रसोल केमिकल्स लिमिटेड या व्यवसायसंस्थेच्या प्रस्तावित कारखान्यासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे आयोजित करण्यात आलेल्या या जनसुनावणीचे स्वातग आहे. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, मे. प्रसोल केमिकल्स लिमिटेड या कारखान्यामध्ये फिनॉल व एसीटोनची निर्मिती झाल्यानंतर, निर्माण होणा-या वायु/ जल प्रदूषणामुळे या विभागातील वन्य जीवांवर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी कारखान्यातर्फे घेण्यात यावी.

त्यांनी पुढे अशी सूचना केली की, मे. प्रसोल केमिकल्स लिमिटेड या कारखान्याने प्रकल्पाच्या कामाकरिता ४० कर्मचारी घेण्यात येणार असल्याचे तसेच ६० कर्मचारी कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणार असल्याचे सादरीकरणाव्दारे नमूद केले आहे. परंतु कर्मचा-यांची नियुक्ती करताना स्थानिक उमेदवारांना नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे.

...४.

**श्री.रामचंद्र देशमुख :-** जनसुनावणीचे स्वागत करताना त्यांनी अशी विचारणा केली की, कारखाना उभा राहिला आणि नंतर काही समस्या उद्भवल्या तर काय करणार आहेत ? या परिसरातील सामान्य नागरिकांना व पशु / पक्ष्यांना त्रास न होता कारखाना उभा राहिण्याकरिता कंपनी व्यवस्थापन सादरीकरणाच्या माध्यमातून निदर्शनास आलेल्या उपाययोजनांची नक्की योग्य प्रकारे काळजी घेईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**श्री. दिलीप देशमुख,** होनाड गावः- मे. प्रसोल केमिकल्स लिमिटेड हा उद्योग या परिसरामध्ये १९९५ पासून कार्यरत आहे. या व्यवसायसंस्थेने सादरीकरणाच्या माध्यमातून, या विस्तारीत कारखान्यामध्ये कंपनी एक ट्रेनिंग सेंटर स्थापित करेल, नोकरीच्या दृष्टीने असलेले व्यावसायिक पाठयक्रम जसे फिटर / इलेक्ट्रीशियन /प्लंबर इ. शिकविण्यात येईल, स्थानिक शाळांमध्ये इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या विकासासाठी मदत करण्यात येईल, बस स्टॉपवर शेड बांधण्यात येईल, ६ महिन्यातून एकदा वैद्यकीय चिकित्सा शिबीर भरविण्यात येईल, असे अनेक संकल्प केल्याचे दिसून येत आहे. परंतु संबंधित व्यवसाय संस्थेने मागील १८ वर्षात सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून असे कोणतेही संकल्प पूर्ण न केल्याने या कारखान्याच्या व्यवस्थापनाला सामाजिक बांधिलकीची जाणीव असल्याचे दिसत नाही.

या प्रस्तावित प्रकल्पामध्ये ४० कर्मचारी घेतले जाणार असून ६० कर्मचारी कंत्राट पध्दतीने नियुक्त केले जाणार आहेत. अशाप्रकारे कंपनीच्या आस्थापनेवर केवळ ४० टक्के कर्मचारी काम करणार असून ६० काम करणा-या कर्मचा-यांना म्हणजे ६० टक्के कर्मचा-यांना किमान वेतनावर काम करावे लागणार आहे. परिणामी, कर्मचा-यांवर होणारा खर्च कमी व संबंधित कारखान्याचा आर्थिक लाभ यामध्ये अधिक असे असतानाही कंपनी व्यवस्थपनाने रोजगार उपलब्ध करुन देणार असे गोंडस नांव याला दिले आहे.

त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, या जनसुनावणीस नागरिकांनी जास्त संख्येने उपस्थित रहावे याकरिता त्याची जाहिरात होणे गरजेचे होते. परंतु या जनसुनावणीची विस्तृत जाहिरात करण्यात आलेली नाही. ते पुढे असे म्हणाले की, त्यांना जनसुनावणीच्या दिवशी म्हणजे आज सकाळी १०.०० वा. सांगण्यात आले. काही नागरिकांना जनसुनावणीस उपस्थित राहण्याकरिता कंपनीतर्फे वैयक्तीकरित्या निरोप देण्यात आले आहे. आजच्या जनसुनावणीकरिता ५००० ते ७००० इतक्या संख्येने उपस्थिती आवश्यक होती परंतु जाहिरात योग्यरित्या न केल्याने केवळ १०० नागरिकांची उपस्थिती या जनसुनावणीमध्ये दिसून येत असून त्यामध्ये काही संबंधित व्यवसायसंस्थेने कर्मचारी देखील आहेत. त्यामुळे ७००० जनसंख्या असलेल्या गावाच्या हिताचा निर्णय केवळ १०० व्यक्तीनी घ्यावा ही बाब योग्य नाही.

...५.

त्यांनी पुढे अशी विचारणा केली की, एखाद्या गावामध्ये कारखाना उभा राहणे ही वाईट गोष्ट नसली तरी त्या कंपनीतर्फे गावक-यांच्या हिताचे निर्णय का घेतले जात नाहीत? या सादरीकरणातून केमिकल संदर्भात करण्यात आलेली भाषा गावातील किती लोकांना समजली? फिनोल व एसीटोनच्या उत्पादनामधून निर्माण होणा-या घातक घनकच-याची विल्हेवाट लावण्याकरिता तो तळोजा येथे पाठविण्यात येणार आहे असे सादरीकरणामध्ये सांगण्यात आले. परंतु तळोजा येथील संस्थेला तेवढया घनकच-याची आवश्यकता असणार आहे का?

त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, या विभागामध्ये मागील १० वर्षांपासून वायु प्रदूषण होत असल्याच्या तक्रारी अनेकदा करण्यात आल्या होत्या. परंतु प्रशासनामार्फत कोणतीही कारवाई करण्यात येत नाही. आजच्या जनसुनावणीमध्ये जे सादरीकरण करण्यात आले त्यामध्ये गावामध्ये वाहणा-या नदीचा, नॅशनल हायवे यांचा उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यांनी पुढे अशी विचारणा केली की, कारखान्याचे क्षेत्रफळ किती? गार्डनकरिता कारखान्याचे किती क्षेत्रफळ वापरण्यात येणार आहे? बागकामासाठी या प्रकल्पाच्या युटीलिटीमधून निघणा-या २१ घन. मी. प्रदूषित पाण्याची आवश्यकता असणार आहे का?

त्यांनी पुढे अशी विनंती केली की, मे. प्रसोल केमिकल्स लि. या व्यवसायसंस्थेने सादरीकरणाच्या माध्यमातून जी वचने या जनसुनावणीमध्ये दिली आहेत ती त्यांनी कसोशिने पाळावीत याची कंपनी व्यवस्थापनाकडून खात्री करुन घ्यावी व त्यानंतरच सदरहू प्रकल्पाला मंजूरी द्यावी.

**श्री. उमेश पाटील,** चिंचोली ग्रामपंचायतः- आजच्या जनसुनावणीच्या माध्यमातून जे सादरीकरण मे. प्रसोल केमिकल्स लि. या व्यवसायसंस्थेतर्फे करण्यात आले त्याचे स्वागत करीत आहे. ते पुढे असे म्हणाले की, केमिकल प्रकल्प उभा राहिल्यानंतर त्यामुळे गावाला किती धोका पोहोचू शकतो याची चाचणी होणे गरजेचे आहे. कारण ज्याप्रमाणे काही वर्षापूर्वी मध्यप्रदेश येथील भोपाळ शहरामध्ये वायु गळतीमुळे जी दुर्घटना घडली तशी येथे घडता कामा नये याकरिता कंपनी प्रशासनाने विशेष दक्षता घेणे गरजेचे आहे. तथापि, जे सादरीकरण करण्यात आले त्यामध्ये अशी परिस्थिती उदभवल्यास कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत त्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. जर कारखान्यामध्ये स्फोट झाला तर कोणत्या उपाययोजना करणार? त्यांनी पुढे सुचविले की, कारखाना परिसरामधील प्रत्येक ग्रामस्थाची दरवर्षी वैद्यकीय चाचणी होणे गरजेचे आहे. जर कारखान्यामधून निघणा-या वायुमुळे किंवा पाण्यामुळे गावक-यांना त्रास झाला तर त्याची जबाबदारी प्रशासन किंवा कंपनी व्यवस्थापन घेणार आहे का?

...६.

**श्री.हरिशचंद्र देवकर:-** आजच्या सुनावणीस उपस्थित असलेले मा. जिल्हाधिकारी साहेब, मा. तहसिलदार साहेब, पदाधिकारी व समस्त ग्रामस्थ यांचे स्वागत. ते पुढे असे म्हणाले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयोजित केलेल्या आजच्या जनसुनावणीमध्ये मराठी भाषेमध्ये जरी सादरीकरण करण्यात आले असले तरी त्यामध्ये केमिकल भाषेतील इंग्रजी शब्द अधिक असल्याने ते उपस्थित ग्रामस्थांना किती समजले असेल याबाबत त्यांनी शंका व्यक्त केली. या सादरीकरणाबाबत उपस्थित सदस्यांपैकी किती शेतकरी आपले विचार व्यक्त करणार आहेत? कारण जे शेतकरी येथे उपस्थित आहेत ते सर्वसामान्य शेतकरी असून रोजंदारी करुन आपला उदरनिर्वाह करीत आहेत.

त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, सादरीकरणादरम्यान असे वारंवार सांगण्यात आले की, घातक घनकच-याची निर्मिती झाल्यानंतर त्याची विल्हेवाट लावण्यात येईल, अशा प्रकारे जर फिनॉल आणि एसीटोनची निर्मिती करताना इतक्या मोठया प्रमाणात घातक घनकचरा / वायू/ पाणी निर्माण होणार असेल तर या कारखान्यात निर्माण करण्यात येणारे मुख्य उत्पादन किती घातक असणार आहे? याबाबत कंपनी प्रशासनाने खुलासा करणे आवश्यक आहे. जर वायु प्रदूषणामुळे त्रास होणार नाही, वायु व जल साठवण करुन नंतर त्यावर प्रक्रिया करणार असले तरी साठवून ठेवलेल्या विषारी वायुमुळे व जल साठयामुळे या परिसरातील शाळांमधील विद्यार्थी व नदीनाले यांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यांनी पुढे अशी विचारणा केली की, जे सादरीकरण करण्यात आले त्यामध्ये या परिसरातील शाळेचा उल्लेख का करण्यात आलेला नाही? या गावामधील शाळांमध्ये लहान विद्यार्थी शिक्षण घेत असून कारखान्यामुळे या विद्यार्थ्यांवर कोणताही विपरीत परिणाम होता कामा नये यासाठी कंपनी प्रशासनाने विशेष काळजी घेण्याची गरज आहे. कंपनी प्रशासन येथील स्थानिक तरुणांना नोकरीमध्ये सामावून घेण्यात आहे ही आनंदाची बाब असल्याने त्यास विरोध नाही.

तरी मान्यवरांनी या सर्व गोष्टींचा विचार करुनच मे. प्रसोल केमिकल्स लि. या व्यवसायसंस्थेचा विस्तार करण्यास परवानगी द्यावी अशी मी पंचक्रोशीतील समस्त नागरीकांच्यावतीने आपणांस विनंती करीत आहे.

**श्री.संदीप पाटील:-** आपल्या विभागामध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या कारखान्यामुळे जे प्रदूषण होत आहे, त्यावर नियंत्रण राखण्याचे काम संबंधित कंपनी प्रशासनाकडून होत नाही.संपूर्ण परिसरामध्ये प्रदूषण झालेले आहे. अशा परिस्थितीत आणखी एक नवीन कारखाना गावामध्ये उभा केल्यास, या प्रदूषणामध्ये भर पडणार आहे ही बाब देखील प्रशासनाने विचारात घेणे गरजेचे आहे.

...७.

त्यामुळे मे. प्रसोल केमिकल्स लि. या व्यवसायसंस्थेच्या विस्तारीत कारखान्यास त्यांनी विरोध दर्शविला. जरी औद्योगिकरण करणे योग्य असले तरी नागरिकांच्या जिवीताचा प्रश्न देखील तितकाच महत्वाचा असल्याने सदर कारखाना अन्य ठिकाणी हलविणे योग्य होईल अशी विनंती केली.

**श्री. दिनेश पाटील, दैनिक सागर वृत्तपत्र :-** मे. प्रसोल केमिकल लि. या व्यवसायसंस्थेतर्फे कारखाना विस्तारीकरणाबाबत जे सादरीकरण करण्यात आले त्याचे त्यांनी स्वागत केले. या जनसुनावणीस व जनसुनावणीच्या माध्यमातून जे सादरीकरण होणार आहे, त्यास विस्तृत प्रसिध्दी मिळावी यास्तव आम्हा पत्रकार बंधूंना येथे कंपनी व्यवस्थापनाने पाचारण केले आहे. या जनसुनावणीच्या माध्यमातून कारखाना उभा करण्यासाठी किती निधी लागणार आहे. किती खर्च उत्पादनावर होणार आहे, सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी किती खर्च करणार आहे याची सविस्तर माहिती सादर केली त्याबद्दल त्यांनी कंपनी प्रशासनास धन्यवाद दिले.

त्यांनी पुढे असे सांगितले की, स्थानिकांच्या मनात वायु व जल प्रदूषणाबाबत शंका असल्याने, कंपनी प्रशासनाने या जनसुनावणीच्या माध्यमातून दिलेला शब्द तंतोतंत पाळावा. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, काही वर्षापूर्वी या विभागामध्ये घातक पाणी तळोजा येथे न पाठविता एका कंपनीने ते गावामध्येच सोडले त्यामुळे या विभागातील जनावरे मुत्यूमुखी पडली होती. त्यांनी पुढे अशी विनंती केली की, कंपनी प्रशासनाने अशी घटना घडू नये याबाबत पूर्ण दक्षता घ्यावी.

जनसुनावणीमधील उपस्थित ग्रामस्थांचे विचार /प्रश्न व्यक्त झाल्यानंतर, मा. जिल्हाधिकारी यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप-प्रादेशिक अधिकारी, श्री. वाघमारे यांना सांगितले की, या जनसुनावणीच्या विस्तृत प्रसिध्दीबाबत त्यांनी उपस्थितांना खुलासा करावा.

श्री.एस.एल. वाघमारे यांनी अशी माहिती दिली की, आजच्या जनसुनावणीसंदर्भात दैनिक कृषिवल या स्थानिक व इंडियन एक्सप्रेस या राष्ट्रीय पातळीवरील वर्तमानपत्रामध्ये दिनांक १५/०४/२०१३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्याचप्रमाणे, प्रकल्पाच्या सारांशाची आणि पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची सत्यप्रत ही मराठी आणि इंग्रजीत जिल्हाधिकारी रायगड, उप विभागी अधिकारी खालापूर, पंचायत समिती खालापूर, ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय होनाड, जिल्हा उद्योगकेंद्र कार्यालय अलिबाग, पर्यावरण विभाग (मंत्रालय) महाराष्ट्र शासन , केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालय भोपाल, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई आणि रायगड येथे सामान्य नागरिकांसाठी ठेवण्यात आली होती. तसेच या जनसुनावणीसंदर्भात अधिक माहिती गांवक-यांना हवी असल्यास ते प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयाला व वरील ठिकाणी संपर्क साधू शकतात असेही अहवान करण्यात आले होते.

...८.

मा. जिल्हाधिकारी यांनी घातक कचरा म्हणजे नेमके काय, तसेच घातक घनकच-याची कशी विल्हेवाट लावणार आहे याची उपस्थितांना सविस्तर माहिती देण्यास सांगितले.

श्री.राजीव औंधे, संचालक, आदित्य एन्व्हायर्नमेंटल सर्व्हिसेस प्रा.लि. यांनी अशी माहिती दिली की, घातक घनकच-याच्या हाताळणी व विल्हेवाटीबाबत नियमावली, केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाने केलेली आहे. सदर नियमावलीमधील अटी व शर्तीनुसार कारखान्यातून निर्माण होणा-या घातक घनकच-याची विल्हेवाट करण्यात येईल.

मा. जिल्हाधिकारी यांनी अशी विचारणा केली की, प्रदूषित पाण्याची विल्हेवाट कशी लावणार याची माहिती उपस्थितांना देण्यात यावी.

श्री. राजीव औंधे, संचालक, आदित्य एन्व्हायर्नमेंटल सर्व्हिसेस प्रा.लि. यांनी अशी माहिती दिली की, प्रक्रियेमधून निघणा-या प्रदूषीत पाण्यावर बाष्पीभवनाची तिहेरी प्रक्रिया केल्यानंतर ते पुन्हा वापरात येणार आहे. या प्रक्रियेमध्ये जे बाष्प तयार होणार आहे ते देखील शुध्द पाणीच असणार आहे. या प्रक्रियअंती जो गाळ शिल्लक राहील तो तळोजा येथे पाठविण्यात येणार आहे. तसेच इतर दुषित पाण्यावर प्रक्रिया केल्यानंतर बागकामांसाठी करण्यात येईल आणि उरलेले प्रक्रिया झालेले पाणी प्रिया सीईटिपीला पाठविण्यात येईल (सामायिक प्रक्रिया व विल्हेवाट केंद्र पाताळगंगा, ता. खालापूर, जिल्हा-रायगड).

मा. जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, या कारखान्यामुळे शेजारच्या नागरीकांना व त्यांच्या पाळीव जनावरावंर कोणता विपरीत परिणाम होऊ शकातो?

श्री. राजीव औंधे, संचालक, आदित्य एन्व्हायर्नमेंटल सर्व्हिसेस प्रा.लि. यांनी अशी माहिती दिली की, या कारखान्यामध्ये प्रक्रियेअंती निर्माण होणारे प्रदूषित पाणी आजुबाजूच्या परिसरात किंवा शेतामध्ये सोडण्यात येणार नाही. जो घनकचरा निर्माण होईल तो गावाबाहेर पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल. या कारखान्याच्या परिसरात हवेचे प्रदूषण होऊ नये याकरिता हवेची पातळी किती असावी याकरिता केंद्र शासनाने निश्चित केलेल्या मानका (standerd) नुसार चाचणी करण्यात येईल.

परिसरामध्ये हवेचे प्रदूषण होऊ नये याकरिता लोखंडाच्या दोन धुरांडयाच्या माध्यामातून धुर वर सोडण्यात येणार आहे. या दोन्ही धुरांडयाची उंची ३० मीटर इतकी असणार आहे. या धुरांडयांना फिल्टर, धुलिकण बाजूला करणारी यंत्र बसवून प्रदूषण कमी करण्यात येईल. यावर केंद्रीय पर्यावरण खात्याचे नियंत्रण असल्याने, त्यांनी निश्चित केलेल्या नियमांनुसार वातावरणातील प्रदूषणाची पातळी राखण्यात येणार आहे. याकरिता केंद्रीय पर्यावरण विभागाकडून परवाना असणा-या प्रयोगशाळेत हवेच्या नमुन्यांची नियमित तपासणी करण्यात येते.

...९.

तद्नंतर त्यांनी फ्लाय ॲशचेच्या व्यवस्थापना संबंधीचे धोरण नुसार हाताळले जाईल असे सांगितले.

मा. जिल्हाधिकारी यांनी अशी विचारणा केली की, कंपनी प्रशासनाने आतापर्यंत त्यांच्या कंपनीमध्ये किती स्थानिकांना नोकरीची संधी उपलब्ध करुन दिली आहे? तसेच प्रस्तावित कारखान्यामध्ये किती स्थानिक तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध करुन देणार आहेत?

श्री.गावडे व्यवस्थापक, एच.आर.मे.प्रसोल केमिकल लि. यांनी अशी माहिती दिली की, कंपनीच्या विद्यमान कारखान्यामध्ये ८४ टक्के स्थानिकांना नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात आले आहे. यामधील १२० कर्मचारी कायम स्वरुपाच्या नोकरीत आहेत. ६० ते ७० कर्मचारी हे कंत्राटी पध्दतीवर काम करीत आहेत. विद्यमान कारखान्यामध्ये स्थानिक कंत्राटदार ३ ते ४ जण आहेत.

त्यांनी पुढे असे आवाहन केले की, स्थानिक शिक्षित तरुणांनी जास्तीत जास्त संख्येने कंपनी प्रशासनाकडे नोकरीकरिता अर्ज करावेत. मे. प्रसोल केमिकल लि. तर्फे फिटर, वेल्डर इत्यादी करिता प्रशिक्षण केंद्र सुरु होणार असून गावातील होतकरुन महिलांना शिलाई मशीन देण्याचाही कंपनी प्रशासनाचा मानस आहे. त्याचप्रमाणे, वैद्यकीय शिबिराचे आयोजन देखील करण्याचे प्रशासनाच्या विचाराधीन आहे.

मा. जिल्हाधिकारी यांनी अशी विचारणा केली की, १९९५ मध्ये कारखाना स्थापित झाल्यापासून कंपनी प्रशासनाने या गावातील नागरीकांसाठी सामाजिक बांधिलकी म्हणून कोणते कार्य केले आहे?

श्री.गावडे, व्यवस्थापक, एच.आर.मे.प्रसोल केमिकल लि. यांनी अशी माहिती दिली की, गावामध्ये जेवढया शाळा आहेत त्यांना वेळोवेळी कंपनी प्रशासनातर्फे सहकार्य करण्यात आलेले आहेत. ज्या शाळांना संगणक उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली त्यांना संगणक उपलब्ध करुन देण्यात आले. त्याचप्रमाणे गावामध्ये उभारण्यात येणा-या मंदिराच्या बांधकामांसाठी किंवा अन्य कार्यक्रमांकरिता देणगी स्वरुपात निधी उपलब्ध करुन देण्यात आला . परंतु मोठया प्रमाणात कार्य झालेले नाही हयाची कबुली दिली.

मा. जिल्हाधिकारी यांनी अशी विचारणा केली की, या परिसरातील विद्यामान कारखान्याबाबत ज्या तक्रारी कंपनी प्रशासनाकडे आल्या त्यावर प्रशासनाने कोणती कार्यवाही केली आहे?

श्री.गावडे, व्यवस्थापक, एच.आर.मे.प्रसोल केमिकल लि. यांनी अशी माहिती दिली की, कारखान्याच्या परिसरात वास येतो अशी तक्रार प्राप्त झाली होती. त्यावेळी तक्रारीची तात्काळ दखल घेऊन स्क्रबर यंत्रणा बसविण्यात आली. यापुढेही गावक-यांकडून सुचना प्राप्त झाल्यास त्याची अंमलबजावणी करण्यासाठी कंपनी प्रशासनातर्फे प्रयत्न करण्यात येतील.

...१०.

मा. जिल्हाधिकारी यांनी अशी विचारणा केली की, विस्तारीत कारखान्याकरिता असलेल्या १६ एकर जागेमध्ये किती झाडे लावण्याची कंपनी प्रशासनाची योजना आहे?

श्री.गावडे, व्यवस्थापक, एच.आर.मे.प्रसोल केमिकल लि. यांनी अशी माहिती दिली की, यांनी अशी माहिती दिली की, प्रस्तावित कारखान्याच्या जागेमध्ये ५०० ते ५५० झाडे आहेत. विशेषतः रायगड जिल्हयाला अनुकूल अशी झाडे लावण्याची कंपनी प्रशासनाची बांधिलकी असणार आहे. कारखान्याचे बांधकाम झाल्यानंतर २१,४२७ चौरस मीटर एवढी जागा हरित पटटयाकरिता वापरण्यात येणार आहे.

मा. जिल्हाधिकारी यांनी अशी विचारणा केली की, भोपाळ सारखी दुर्देवी घटना होऊ नये याबद्यल ग्रामस्थांमध्ये असलेली शंका दूर करण्याकरिता विस्तृत स्पष्टीकरण करण्यात यावे.

श्री.राजीव औंधे, संचालक, आदित्य एन्व्हायर्नमेंटल सर्व्हिसेस प्रा.लि.यांनी अशी माहिती दिली की, भोपाळ शहरामध्ये जी दुर्देवी घटना घडली त्या घटनेमध्ये जो विषारी वायु वातावरणात पसरला होता त्याचे नांव मिथाईल वायु असून हा वायु अधिक उग्र व विषारी असल्यामुळे, तेथील नागरिकांचे दुर्देवी बळी गेले. पंरतु संबंधीत प्रसोल केमिकल कारखान्यामध्ये निर्माण होणारे केमिकल व त्यामुळे निर्माण होणारा वायु हा तितका विषारी नसून फक्त ज्वलनशील आहे म्हणून वातावरणात पसरला तरी भोपाळ सारखी दुर्देवी घटना येथे घडणार नाही.

मा. जिल्हाधिकारी यांनी अशी विचारणा केली की, कंपनीच्या परिसरातील शाळांमधील मुलांची वैद्यकीय तपासणी करण्यात येत आहे का?

श्री.गावडे, व्यवस्थापक, एच.आर.मे.प्रसोल केमिकल लि. यांनी अशी माहिती दिली की, आजपर्यंत शाळांमधील वैद्यकीय तपासणी करण्यात आलेली नाही. यापुढे शाळांमधील मुलांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल असे नमूद केले.

मा. जिल्हाधिकारी यांनी अशी विचारणा केली की, H२S गॅस चा वास येऊ शकतो. अशा परिस्थितीत काय उपाययोजना कंपनी प्रशासन करणार आहे? याची माहिती द्यावी.

श्री.राजीव औंधे, संचालक, आदित्य एन्व्हायर्नमेंटल सर्व्हिसेस प्रा.लि.यांनी अशी माहिती दिली की, प्रक्रियेमधून निर्माण होणारा हायड्रोजन सल्फाइड गॅस दोन टप्पयाच्या स्क्रबरव्दारे प्रक्रिया करण्यात येईल आणि त्यातून उरणारे अवशेष चिमणीमधून जाळण्यात येतील.

...११.

श्री. गायकवाड असे म्हणाले की, आज आपण येथे मे. प्रसोल केमिकल लि. या व्यवसायसंस्थेच्या जनसुनावणीकरिता जमले आहोत. परंतु या कंपनीव्यतिरिक्त या विभागातील अन्य कंपन्यांच्या कारखान्यांमधून निघणा-या वायुमूळे व पाण्यामुळे प्रदूषण होत असल्याबद्यल अनेकदा संबंधितांकडे तक्रारी करण्यात आल्या. परंतु त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. या विभागातील विहीरी व बोरींग खराब झाल्याबद्यल स्थानिक नागरिक मागील वर्षापासून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी करीत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने अशा कंपन्यांवरही कारवाई करणे आवश्यक आहे.

मा. जिल्हाधिकारी यांनी असे सांगितले की, या बाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांनी मे. व्हिसन कंपनीमुळे होणा-या प्रदूषणाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन या प्रकरणी झालेल्या कारवाईचा अहवाल पुढील १५ दिवसात जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावा.

ते पुढे असे म्हणाले की, आज मे. प्रसोल केमिकल लि. या व्यवसायसंस्थेच्या विस्तारीकरणानिमित्त आयोजित केलेल्या जनसुनावणीमध्ये अनेक मुद्दे उपस्थित करण्यात आले परंतु वायु प्रदूषण हा प्रामुख्याने मुख्य विषय होता. वायु प्रदूषणामुळे कारखान्याच्या सभोवतालच्या परिसरामधील जनावरे व शेती यांना नुकसान पोहोचू नये अशी मागणी अनेक ग्रामस्थांनी केली आहे. त्यामुळे वायु प्रदूषणाबाबत संबंधित कंपनी प्रशासनाने योग्य दक्षता घेणे गरजेचे आहे. संबंधित कंपनीला कारखाना उभारण्यास परवानगी मिळाल्यानंतर व कारखाना उभा राहिल्यानंतर हवेवे प्रदूषण होऊ नये याकरिता हवेच्या पातळीची चाचणी करण्यात येईल व हवेमधील प्रदूषणाचे प्रमाण केंद्रीय पर्यावरण खात्याने निश्चित केलेल्या मानकांनुसार नसल्याचे आढळून आल्यास, संबंधित कंपनीच्या कारखान्याची परवानगी रद्य होऊ शकते.

ते पुढे असे म्हणाले की, मे. प्रसोल केमिकल लि. च्या प्रशासनाने आश्वासन दिल्यानुसार स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध करुन द्यावयास हवा.

समारोपादरम्यान मा अध्यक्षांनी असे सुचित केले की, संबंधित कारखाना या ठिकाणी मागील १८ वर्षापासून स्थित असल्यामुळे, सामाजिक बांधिलकी म्हणून कंपनी प्रशासनाने भरीव कार्य करण्याची आवश्यकता आहे. मात्र सामाजिक बांधिलकी करताना शाळांना प्राधान्य देणे, ज्येष्ठ नागरीक तसेच महिलांची वैद्यकीय तपासणी करणे या बाबी गरजेच्या आहेत. याकरिता कंपनी प्रशासनाने ग्रामस्थांकरिता वेगवेगळी वैद्यकीय शिबिरे आयोजित करावीत.

..१२.

त्यांनी पुढे अशी माहिती दिली की, प्रस्तावित कारखान्याच्या परिसरामध्ये शाळा असल्यामुळे, तेथे वायु प्रदूषण होणार नाही यादृष्टीने कंपनी प्रशासनाने उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच कारखान्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी ३३ टक्के क्षेत्रफळ हे हरित पटटयाकरिता वापरण्याबाबत तसेच कारखान्यामधून निर्माण होणारा घातक कचरा आजुबाजूच्या नदीनाल्यांमध्ये जाणार नाही/ झिरपणार नाही याचीही कंपनी प्रशासनाने विशेष काळजी घ्यावी.

आजच्या जनसुनावणीमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या मुद्दयांबाबतचा कंपनी प्रशासनाने जे आश्वासन दिले आहे, जो शब्द दिला आहे त्याचे तंतोतंत पालन होणे आवश्यक आहे. ज्या उपाययोजना करणार आहेत त्या पूर्ण केल्या पाहिजेत.

ते पुढे असे म्हणाले की, कंपनी प्रशासनातर्फे कारखान्यामुळे पर्यावरण नियंत्रण उपाय करण्यासाठी २ कोटी १० लाख इतकी रक्कम खर्च करण्यात येणार आहे. तसेच त्याकरिता देखभाल खर्च रुपये ५२ लाख प्रतिवर्षी कंपनीतर्फे खर्च करण्यात येणार आहेत.

मा. जिल्हाधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, आजच्या जनसुनावणीच्या माध्यमातून उपस्थित ग्रामस्थांनी जे मुद्दे / विचार व्यक्त केले आहेत, त्याची लेखी व छायाचित्रणाव्दारे नोंद घेण्यात आली असून त्याचा अहवाल तयार करण्यात येऊन तो दिल्ली येथील केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडे पाठविण्यात येईल. केंद्र शासनाने परवानगी दिल्यानंतरच कारखाना सुरु होईल. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारखान्याची नियमितपणे तपासणी करण्यात येईल व आक्षेपार्ह आढळल्यास कंपनीवर कारवाई अधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला आहेत.

तद्नंतर, त्यांनी आजच्या जनसुनावणीस उपस्थित राहून आपले विचार व्यक्त केल्याबद्दल उपस्थित सर्व ग्रामस्थांचे आभार मानले व जनसुनावणी समाप्त झाल्याचे घोषित केले.

| | | |
|---|---|---|
| **(शं.ल.वाघमारे)** | **(भ.पि.सोळूंके)** | **(एच.के.जावळे)** |
| उप-प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक अधिकारी,रायगड | जिल्हाधिकारी, रायगड, |
| मप्रनिमंडळ,रायगड-१ | सदस्य, जनसुनावणी समिती | अध्यक्ष, जनसुनावणी समिती |
| आयोजक, जनसुनावणी समिती | | |

*************